# कोविड १९ अंतर्गत कक्षसेवक पदभरती सन २०२०-२१

# उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.

पुणे परिमंडळांतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान पुणे, सोलापुर, सातारा करीता रिक्त पदांची भर्ती प्रक्रिया खालील तकत्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ६ महिन्याकरिता मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ईमेल द्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयो मर्यादा | एकत्रित मानधन | जिल्हा | या ईमेल आयडी वर अर्ज द्यावेत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कक्ष सेवक (Ward Boy) | १० वी पास शारिरीकरित्या सक्षम | ४३ वर्ष पर्यंत | रु.४००/- डेली वेजेसनुसार | पुणे साठी<br>पुणे महानगरपालिकासाठी<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकासाठी | c19wardboypune@gmail.com |
| | | | | | सातारा करिता | c19wardboysatara@gmail.com |
| | | | | | सोलापुर करिता<br>सोलापुर महानगरपालिका करिता | wardboysolapur@gmail.com |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी दि.२१.०५.२०२० ते २३.०५.२०२० रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या उपरोक्त नमुद नमुद जिल्हा/महानगरपालिका पुढे दिलेल्या ई-मेल वरच अर्ज सादर करावा. दुसऱ्या ईमेलवर अर्ज केला तर त्याच जिल्हा/महानगरपालिका मध्ये ग्राहय धरण्यात येईल. अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) दहावी पास प्रमाणपत्र ३)शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) निवासी पुरावा ७) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत <u>**जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यासह एकाच पिडीएफ फाईलमध्ये ई-मेल वर सादर करावा. उमेदवाराचे अर्ज फक्त ई-मेलद्वारे स्विकारण्यात येतील अर्ज पोस्टाद्वारे कुरिअर/प्रत्यक्षात आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. एका उमेदवाराने एकाच पदासाठी अर्ज करणे अनिवार्य ही यांची नोंद घ्यावी.**</u>

२) सदर पदासाठीच्या अर्जाचा नमुना **www.nhm.maharashtra.gov.in** & **www.arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरुन download करावा.

३) उपरोक्त पदांसाठी उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास एन.एच.एम अंतर्गत व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हताधारक शासकिय सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहतील.

४) उमेदवाराने सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये पदाचे नांव व पदस्थापनेचे ठिकाण (पुणे, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सातारा, सोलापूर, सोलापूर मनपा) स्पष्ट नमुद करावे, तसेच खाडाखोड,

Ward Boy Recruitment

Scanned with CamScanner

अवाचनिय अर्ज सादर करु नये अन्यथा संबंधित उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

५) उपरोक्त जाहिरातीतील १ या पदाकरिता पुणे, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सातारा, सोलापूर मनपा सोलापूर जिल्हयातील सक्षम काम करण्यास तयार आणि मधुमेह/उच्च रक्तदाब/हृदयविकार इ. नसणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी,बॉंड संपलेले वैद्यकिय अधिकारी यांना सदर पदभरतीकरीता प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जात शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झाले त्याबाबतची सर्व माहिती व पुरावा अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

६) नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ए-४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक दस्ताऐवज स्कॅन करुन दि.२३.०५.२०२० रोजी सायं ०५.०० वाजेपर्यत " उपसंचालक आरोग्य सेवा पुणे मंडळ, पुणे यांच्या नावाने वर दिलेल्या जिल्हानिहाय ईमेल आयडीवर सोबत दिलेला अर्ज, इतर शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे एकाच PDF File मध्ये सादर करावे.उमेदवारांनी ई-मेलच्या विषयामध्ये "Application For the post.................स्पष्ट नमुद करावे.विहीत मुदतीनंतर ई-मेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज आणि अपुर्ण माहितीचे अर्जाचा विचार केला जाणार नाही.

७) सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात (एनएचएमच्या वेबसाईट वर उपलब्ध अर्जाचा नमुना) अर्ज करणे बंधनकारक राहील.

८) सदरचे पदे ६ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहेत.

९) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

१०) ई मेल द्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना १० वी मध्ये मिळालेले गुण व शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

११) मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती www.nhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच त्याच दिवशी आक्षेप मागविण्यात येईल. दुसऱ्या दिवशी आक्षेपाचा विचार करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणेत येईल.

१२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१३) पुर्ननियुक्तीबाबत,शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१४) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

१५) मुलाखत होणार नसल्याने तसेच पदभरतीचे अर्ज ईमेल द्वारेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवु नये. तसेच उपसंचालक कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१६) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा.तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१७) भरतीप्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/ नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल.

१८) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार,पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे,इ.सर्व अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

सही/-

(डॉ.संजय देशमुख)

उपसंचालक आरोग्य सेवा,

पुणे मंडळ, पुणे

Scanned with CamScanner

# कोविड-१९ अंतर्गत कंत्राटी पदाकरिता अर्जाचा नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ पुणे .

पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वता: साक्षांकित करुन लावावे करावा

प्रति,

मा. उपसंचालक,
आरोग्य सेवा, पुणे परिमंडळ, पुणे

पदाचे नाव: ------------------------------------

पद स्थापना ठिकाण जिल्हा ...........................

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------

३) जन्म तारीख :- वर्ष .............. महिना .............. दिवस ............

अक्षरी ----------------------------------------

वय :- .......... वर्ष पुर्ण, ............महिने, ........ दिवस

(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) राहण्याचा पत्ता :- ------------------------------------------------------

------------------------------------------------------

------------------------------------------------------

(मोबाईल क्र.:- ..............................................) (नमुद करणे अनिवार्य)

(ई मेल ID.:- ..................................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही

जातीचा प्रवर्ग :- ------------------

जातीचे नाव :- ------------------

➢ अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ------------------

(नमुद करणे अनिवार्य)

Scanned with CamScanner

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्रं. | काम केलेलया कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)...................................... २)......................................

३)...................................... ४)......................................

५)...................................... ६)......................................

७)...................................... ८)......................................

९)...................................... १०)......................................

१२) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेलया सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- ............ स्वाक्षरी :- ..................................

दिनांक :- / /२०२० अर्जदारांचे नांव:- ..................................

Scanned with CamScanner